# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल:boards@unipune.ac.in

**परिपत्रक क्र. ८०**

विद्यापीठ परिपत्रक क्र. २७०/२०१३, दि. २३ डिसेंबर, २०१३ नुसार दि. १ जानेवारी, २०१४ पासून पदव्युत्तर शिक्षक मान्यता, एम.फिल. संशोधन मार्गदर्शक व पीएच. डी. मार्गदर्शक यांना विद्यापीठाची मान्यता मिळविण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यापुढे प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम सत्रातील व द्वितीय सत्रातील ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याचे वेळापत्रक हे खालीलप्रमाणे असणार आहे. या कालावधीमध्येच संबंधितांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येईल.

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी**

| | | |
|---|---|---|
| १. | **प्रथम सत्र** | **शैक्षणिक वर्षामधील**<br>दि. १ जुलै ते दि. ३१ ऑगस्ट पर्यंत |
| २. | **द्वितीय सत्र** | **शैक्षणिक वर्षामधील**<br>दि. १ जानेवारी ते दि. २८ फेब्रुवारी पर्यंत |

शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रातील ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जांची 'हार्ड कॉपी' ही दि. १५ सप्टेंबर पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय सत्रातील ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जांची 'हार्ड कॉपी' ही दि. १५ मार्च पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर 'हार्ड कॉपी' सादर करण्याच्या अंतिम तारखेस विद्यापीठ कार्यालयास सुट्टी असल्यास पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीही अर्ज स्वीकारले जातील.

उपरोक्त नमूद केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे–४११००७ )
जावक क्र. आरआर/ 333 )
दिनांक : 23 एप्रिल, २०१६ )

संचालक
(म.वि.वि.मं.)